जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

16 JUL 2025 पुढारी

# मुलींचा जन्मदर वाढविण्यासाठी उपाययोजना काळाची गरज

## कुलगुरू डॉ. शिर्के : 'वंध्यत्व निवारण' वैद्यकीय परिषद उत्साहात

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मुलींचा जन्मदर समस्या अजूनही कायम आहे. या समस्येवर उपाययोजना करणे काळाची गरज आहे. यासाठी स्त्रीरोगतज्ज्ञ आणि शिवाजी विद्यापीठाने एकत्रित येऊन काम करूया, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. महाराष्ट्र चॅप्टर ऑफ इंडियन सोसायटी फॉर असिस्टेड रिप्रॉडक्शन (इसार) व कोल्हापूर प्रसूती व स्त्री रोग संघटना आयोजित 'वंध्यत्व निवारण' परिषदेत ते बोलत होते. हॉटेल सयाजी येथे झाली. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. किरण कुर्तकोटी उपस्थित होते.



कोल्हापूर : इसार व कोल्हापूर प्रसूती व स्त्री रोग संघटनेच्या 'वंध्यत्व निवारण' परिषदेचे उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत पद्मरेखा जिरगे, डॉ. रणजित किल्लेदार, डॉ. अमित पत्की, डॉ. तानाजी पाटील आदी. (छाया : पप्पू अत्तार)

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठ, डॉक्टर यांच्या समन्वयाने मुलींच्या जन्मदरवाढीवर मार्ग काढता येईल का? यावर अभ्यासपूर्ण चर्चा होणे महत्त्वाचे आहे, असे सांगितले. इसार संघटनेच्या अध्यक्षा डॉ. पद्मरेखा जिरगे म्हणाल्या, जागतिक दर्जाचे वैद्यकीय तंत्रज्ञान व माहिती स्त्रीरोग तज्ज्ञांना मिळावी. यासाठी ही परिषद उपयुक्त ठरणार आहे. महाराष्ट्र इसार शाखेच्या अध्यक्षपदाची सूत्रे डॉ. अमित पत्की यांच्याकडे डॉ. जिरगे यांनी सोपविली.

दिवसभरात स्त्री व पुरुष वंधत्व, हार्मोनल असंतुलन, आधुनिक आयव्हीएफ, आययूआय, जनुकीय चाचण्या यावर तज्ज्ञांनी सखोल मार्गदर्शन केले. परिषदेत नवोदित डॉक्टरांनी आपले शोधनिबंधांचे सादरीकरण केले. डॉ. रणजित किल्लेदार, डॉ. सतीश पत्की, डॉ. प्रवीण हेंद्रे, डॉ. नंदिता पालशेतकर, डॉ. नलिनी महाजन, डॉ. केदार गनला, डॉ. साधना पटवर्धन, डॉ. चैतन्य शेंबेकर, डॉ. मिलिंद पिशवीकर यांच्यासह स्त्रीरोगतज्ज्ञ डॉक्टर उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. रोहन पालशेकर, डॉ. गरिमा चौगुले यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

16 JUL 2025
सकाळ

# चला, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्रींचे अनुभवूया जीवनकार्य

## शिवाजी विद्यापीठात आजपासून आंतरराष्ट्रीय परिषद

■ **सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १५ : शिवाजी विद्यापीठात बुधवार (ता.१६) पासून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आंतरराष्ट्रीय परिषद होणार आहे.

यानिमित्ताने विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहामध्ये सकाळी दहापासून विशेष प्रदर्शन होणार आहे. तर्कतीर्थांशी निगडित पुस्तके, छायाचित्रे आणि चित्रफिती येथे प्रदर्शित केल्या जाणार आहेत. या प्रदर्शनाला शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनीही भेट द्यावी, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.



**लक्ष्मणशास्त्री जोशी**

शिवाजी विद्यापीठाचे गांधी अभ्यास केंद्र आणि वाई येथील तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी प्रतिष्ठानच्या संयुक्त विद्यमाने परिषद होणार आहे. अमेरिकेतील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अशोक जोशी यांच्या हस्ते बुधवारी (ता.१६) परिषदेचे उद्‍घाटन होईल. अमेरिकेतील शास्त्रज्ञ डॉ. अशोक खंडकर हे प्रमुख पाहुणे असतील. ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकीहाळ यांच्या बीजभाषणाने परिषदेला प्रारंभ होईल. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील.

प्रसिध्द दिग्दर्शक जब्बार पटेल यांचेही गुरुवारी (ता.१७) दुपारी साडेतीन वाजता विशेष सत्रात मार्गदर्शन होईल. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांच्या उपस्थितीत परिषदेचा समारोप होईल. परिषदेला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 JUL 2025
पुढारी

# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या विचारांवर विद्यापीठात आजपासून आंतरराष्ट्रीय परिषद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे विचार आणि कार्य' या विषयावर १६ व १७ जुलै रोजी दोनदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे. अमेरिकेतील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अशोक जोशी यांच्या हस्ते बुधवारी (दि. १६) सकाळी १०.३० वाजता परिषदेचे उद्घाटन होणार आहे. अमेरिकेतील शास्त्रज्ञ डॉ. अशोक खंडकर प्रमुख पाहुणे आहेत. ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकीहाळ यांच्या बीजभाषणाने परिषदेला प्रारंभ होईल. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील. परिषदेच्या निमित्ताने तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची पुस्तके, छायाचित्रे व चित्रफिती यांचे विशेष प्रदर्शनही राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात भरविण्यात येणार आहे. तसेच, तर्कतीर्थांविषयीच्या शोधनिबंधांचे विशेष सत्र आयोजित करण्यात आले आहे. परिषदेत विविध नऊ सत्रांमध्ये चर्चा होणार आहे. या परिषदेस उपस्थित राहावे, असे आवाहन गांधी अभ्यास केंद्राचे डॉ. प्रकाश पवार, डॉ. सुनीलकुमार लवटे व प्रतिष्ठानचे अध्यक्ष पंडित टापरे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 JUL 2025
पुढारी

# आजअखेर ७७४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील आजअखेर ७७४ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले आहेत. विद्यापीठ संलग्न महाविद्यालयात सध्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. मंगळवारी 'पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन इंडस्ट्रियल सेफ्टी' या अभ्यासक्रमाची परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने झाली. परीक्षेला २८ विद्यार्थी उपस्थित होते. दि. १५ रोजी दोन अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.